# महिला दिनानिमित्त 'पीएमपी'ची भेट

## महिलांना 'तेजस्विनी' बसमधून दरमहा ८ तारखेला मोफत प्रवासाची संधी

शहर आणि पिंपरी-चिंचवडमध्ये बसने प्रवास करणाऱ्या महिलांना सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने 'महिला दिना'ची भेट देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) 'तेजस्विनी' बसमधून महिलांना दरमहा ८ तारखेला दिवसभर मोफत प्रवास करता येणार आहे. 'महिला दिना'निमित्त (८ मार्च) उद्यापासून ही योजना सुरू करण्याचा निर्णय पीएमपीच्या संचालक मंडळाने घेतला आहे.

'पीएमपी' बसमधून महिलांना एक दिवस मोफत सेवा देण्याचा निर्णय गेल्या अर्थसंकल्पात घेण्यात आला होता. राज्य सरकारकडून 'तेजस्विनी' बस पीएमपीच्या ताफ्यात दाखल झाल्याने येत्या महिला दिनापासुन शहरातील महिलांना एक दिवस मोफत प्रवास करता येणार असल्याचे महापौर मुक्ता टिळक यांनी जाहीर केले. स्थायी समितीचे अध्यक्ष सुनील कांबळे आणि पीएमपीचे संचालक सिद्धार्थ शिरोळे या वेळी उपस्थित होते. पीएमपीच्या दैनंदिन प्रवाशांमध्ये महिलांचे प्रमाण ४० टक्के आहे. महिलांच्या दैनंदिन प्रवासावर होणारा खर्च पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांकडून पीएमपीला भरून देण्यात येईल, असेही महापौर टिळक यांनी स्पष्ट केले.

पीएमपीच्या ताफ्यात सध्या ३९ तेजस्विनी बस आहेत. त्यापैकी ३० बस पुणे शहरातील विविध मार्गांवर धावतात. तर, उर्वरित नऊ बसचे संचलन पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत होते. तेजस्विनीच्या ताफ्यात आणखी २७ बस दाखल होणार आहेत. त्यामुळे, दोन्ही शहरांत ६६ तेजस्विनी बसमधून प्रवास करणाऱ्या सर्व महिलांना त्याचा लाभ मिळेल, असा दावा शिरोळे यांनी केला.

### खालील मार्गांवर मोफत सेवा

| मार्ग | फेऱ्या |
|---|---|
| कात्रज ते शिवाजीनगर | ६४ |
| अप्पर डेपो ते शिवाजीनगर | ३२ |
| कात्रज ते महाराष्ट्र हौसिंग बोर्ड | ४८ |
| हडपसर ते वारजे माळवाडी | ३२ |
| कोथरूड ते कात्रज | ४८ |
| भेकराईनगर ते मनपा | ३२ |
| स्वारगेट ते धायरी मारुती मंदिर | ३२ |
| मनपा ते लोहगाव | ३२ |
| मनपा ते वडगाव शेरी | २४ |
| मार्केट यार्ड ते पिंपळे गुरव | १२ |
| अप्पा बळवंत चौक ते सांगवी | ४० |
| मनपा ते आळंदी | ६ |
| मनपा ते आकुर्डी/पिंपळे सौदागर | २६ |
| निगडी ते हिंजवडी माण फेज-३ | ३६ |




### तेजस्विनीच्या प्रवाशांनाच लाभ

'पीएमपी'च्या ताफ्यात सध्या केवळ ३९ तेजस्विनी बस आहेत. या बसमधून प्रवास करणाऱ्या महिलांनाच फक्त मोफत प्रवासाची संधी मिळणार आहे. त्यामुळे, पीएमपीच्या उर्वरित बसमधून येणाऱ्या महिलांना पूर्वीप्रमाणे तिकीट काढावे लागणार आहे. त्यामुळे, या योजनेचा फायदा केवळ ठरावीक मार्गांवरील महिलांनाच होण्याची शक्यता आहे.

**२.३३ लाख**

'तेजस्विनी'च्या सरासरी प्रवाशांची प्रतिमहिना संख्या

**२८ लाख**

मार्च २०१८ ते मार्च २०१९ दरम्यान तेजस्विनीतील महिला प्रवासी

**₹ ४ कोटी १२ लाख**

तेजस्विनी बसचे वार्षिक उत्पन्न

"तेजस्विनीच्या ताफ्यात आणखी २७ बस दाखल होणार आहेत. त्यामुळे, तेजस्विनीच्या ६६ बसगाड्यांमधून प्रवास करणाऱ्या महिलांना या निर्णयाचा लाभ मिळेल.

– सिद्धार्थ शिरोळे, पीएमपीचे संचालक